Dubbonaz.bmp/3

2469

जा.क्र./प्रशासन/बीड जि.म.स.बँक/क.८३/चौ/०९
कार्यालय विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था
लातूर.दिनांक:२० /०८/२००९

सहनिबंधक सहकारी संस्था लातूर

वाचा:-१)महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८३
२)सहकारी संस्थाचे नियम १९६१ चे नियम ७२
३)विशेष लेखा परिक्षक वर्ग २ सहकारी संस्था(बँक)बीड यांनी सादर केलेला सन २००६-०७ या वर्षाचा लेखा परिक्षण अहवाल.
४)विशेष लेखापरिक्षक वर्ग-२ सह.सं.(बँक) बीड यांनी सादर केलेला दोष दुरुस्ती अहवाल दिनांक १४/७/२००८
५)श्री.सदामराव पंडीत यांचा तक्रार अर्ज दिनांक २/२/२००८

बीड जि.म.स. बँक जिल्हा बीड या बँकेची नोंदणी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व त्याखालील नियम १९६१ मधिल तरतुदीनुसार झालेली असुन तिचा नोंदणी क्र. एम. २१२५०/५६/दि.९/२/१९५६ आहे.आणि बीड जि.म.स. बँक जिल्हा बीड(यापुढे उक्त बँक असे वाचावे)या बँकेचे कामकाज महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० आणि त्याखालील महाराष्ट्र सहकारी संस्थाचे नियम १९६१ (यापुढे उक्त अधिनियम व नियम असे वाचावे) व बँकेच्या नोंदणीकृत उपविधीतील तरतुदी प्रमाणे करण्यात येते. या बँकेचे कार्यक्षेत्र संपुर्ण बीड महसुली जिल्हा आहे. शासनाकडील आदेश क. १४९३/११६२/सीआर ४०/१५ सी दि. २६/७/१९९९ नुसार विभागीय सहनिबंधक जि. म. सह बँकेचे नोंदणी अधिकारी व निबंधक असुन या बँकेच्या कामकाजाबाबत उक्त अधिनयमाचे तरतुदीचे अधिकार त्याना प्रदान केलेले आहेत आणि कलम ७३ (१)नुसार संचालक मंडळाचे अधिकार, कर्तव्य आणि जबाबदारी निश्चित करण्यात आलेली असून त्याप्रमाणे त्यांनी त्यांची वेधानीक कर्तव्य व जबाबदारी पार पाडावयाची आहे आणि अशा बँकेची सामयीक व वार्षीक लेखा परिक्षणाची तरतुद महाराष्ट्र सह. संस्था अधिनीयम १९६० चे कलम ८१ अंतर्गत करण्यात आलेली असून त्यानुसार विशेष लेखा परिक्षक सहकारी संस्था (बँक) बीड यांची उक्त बँकेच्या सन २००६ ०७ च्या वार्षीक लेखा परिक्षणासाठी नियुक्ती करण्यात आली आणि त्यांनी लेखापरिक्षणाचा अहवाल बँकेस व या कार्यालयास त्यांचे पत्र दिनांक ३१/१०/०७ अन्वये या कार्यालयास दि.११/१२/०७ रोजी प्राप्त झाला असून सदर अहवालातील नमुद दोष दुरुस्तीसाठी पुरेसा कालावधी प्राप्त होऊनही बँकेने समाधानकारक दोष दुरुस्ती केलेली नाही.

सदर लेखा परिक्षण अहवाल व श्री सदामराव पंडीत यांचा दिनांक २/२/२००८ रोजी केलेल्या तक्रारी अर्जाचे प्राथमिक चौकशी अहवालाचे अवलोकन केले असता बँकेच्या आर्थिक,व्यवहारातील अनियमीतता, निधीचा गैरवापर रिझर्व बँक, नाबार्ड व महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेच्या परिपत्रकीय सुचनांचे तसेच बँकेच्या उपविधीतील तरतुदीचे उल्लंघन करुन केलेले कर्ज वाटप व त्यामुळे बँकेचे आर्थीक नुकसान झाले असल्यास किती झाले याची शहानिशा करणेच्या आवश्यकते बाबत माझी खात्री झाली असून त्यास बँकेची रचना कार्यपध्दती आणि आर्थिक स्थिती यांच्या दृष्टीकोनातुन बँकेच्या संघटने मध्ये, व्यवस्थापना मध्ये सहभागी झालेल्या व्यक्ती/अधिकारी, पदाधिकारी यांच्या कृती अथवा अकृती मुळे बँकेचे आर्थिक नुकसान झाले असल्यास त्याची मोजदाद करणे, उत्तरदायीत्व निश्चित करण्याच्या दृष्टीकोणातुन सहाय्यभुत व्हावे म्हणुन क्रमप्राप्त ठरते. त्यासाठी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० अंतर्गत महाराष्ट्र शासनाची अधिसुचना क्रमांक सीएस एल.११६५/सी आर ४७ /१५, सी दिनांक ७ ऑगष्ट १९९३ अन्वये विभागीय सहनिबंधक,सहकारी संस्था यांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन खालील प्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**<u>आदेश</u>**

महाराष्ट्र सहकारी संस्था १९६० चे कलम ८३ अन्वये मला प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन मी, फ.ह. शेख, विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था, लातूर, या आदेशान्वये लोकांच्या तीव्रतेने केलेले बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. बीड या बँकेतील वर्ष २००६-२००७ चे

व्यवहारातील अनियमीतता बाबत व अधिक नुकसान झाले असल्यास निश्चित करणेसाठी श्री. ए. एस. कदम, सहाय्यक निबंधक,सहकारी संस्था (प्रशासन)व्दारा जिल्हा. उपनिबंधक सहकारी संस्था बीड यांची चौकशी अधिकारी म्हणून नियुक्ती करीत आहे. नियुक्ती अधिकारी यांनी त्यांचा अहवाल सदर आदेशाच्या दिनांकापासून सहा महिन्यात या कार्यालयास सादर करावा.

सदर वैधानीक चौकशीसाठी लागणारी स्टेशनरी,पोष्टेज व इतर अनुषंगीक खर्च बँकेकडून घेवून भागवीण्यात यावा. तसेच सदर चौकशीकरिता येणा-या खर्चाची जबाबदारी संबधीतावर निश्चित करुन त्यासाठी समावेश अहवालात करावा.

चौकशी अधिका-याचे मानधनाबाबतचे आदेश अलाहिदा निर्गमीत करण्यात येतील.

हा आदेश आज दिनांक 20/8/२००९ रोजी माझे सहीने व कार्यालयाचे मुद्रेसह निर्गमीत करीत आहे.

(क. ल. शेख )
विभागीय सहनिबंधक
सहकारी संस्था लातूर.

प्रति,

१) श्री. ए.एस. कदम, चौकशी अधिकारी तथा सहाय्यक निबंधक सहकारी संस्था (प्रशासन)सलग्न जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था बीड यांना देवून सुचीत करण्यात येते की, त्यांनी या आदेशा सोबत जोडलेल्या परिशीष्ट मधिल प्रत्येक मुद्यावर कलम ८३ व नियम ७२ अतर्गत चौकशी करुन चौकशी अहवाल आदेशाचे दिनांकापासून सहा महिन्याच्या आत सादर करावा.

२) सरव्यवस्थापक बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. बीड यांना देवून सुचित करण्यात येते की त्यांनी चौकशीचे कामी चौकशी अधिकारी यांना आवश्यक ती कागदपत्रे,संचीका उपलब्ध करुन देवून चौकशीचे कामी सहकार्य करावे.

३) जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था बीड यांना माहितीस्तव

४)विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था (लेखा परिक्षण) औरंगाबाद (सस्नेह)

५)विशेष लेखा परिक्षक वर्ग२ सहकारी संस्था (बँक)बीड यांना माहितीस्तव

**प्रत माहितीस्तव**

१)कार्यकारी संचालक म.रा. सहकारी बँक लि. महाराष्ट्र चेंबर्स ऑफ कॉमर्स लेन फोर्ट मुंबई २३

२)मा.उप सहव्यवस्थापक, भारतीय रिजर्व बँक, मुंबई

३)मा. मुख्य सरव्यवस्थापक राष्ट्रीय कृषी व ग्रामीण विकास बँक प्रादेशीक कार्यालय -५४,गीलेकली पो. बॉ. नं.५ शिवाजीनगर पुणे.

**प्रत माहितीस्तव सादर**

१)मा. प्रधान सचिव महाराष्ट्र शासन,सहकार,पणन,वस्त्रोद्योग विभाग,मंत्रालय मुंबई.३२

२)मा. सहकार आयुक्त व निबंधक,सहकारी संस्था,म.रा. पुणे - १

विभागीय सहनिबंधक
सहकारी संस्था लातूर.

परिशिष्ट

बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.बीड कलम ८३ खाली मुद्दे

लेखा परिक्षण अहवाल सन २००६-२००७

**१. अपहार व नियम बाहय कर्ज वाटप**

१. वैयक्तीक बचत खातेदाराच्या बचत खात्यात आय सी.सी. बोगस चलने बनवुन रु ७,०४२८९/- चा गैरव्यवहार व त्यातील रुपये ६,८२,७८०/- चा परस्पर उचलुन अपहार २२ खातेदारापैकी ४ मयत खातेदाराच्या खात्यावर रुपये १,६३,८७१ /- जमा करुन रुपये १,५६,४२०/- उचल करुन अपहार अज्ञान कास्तकारांचे आकाऊंट पेई चेक आणुन इतर खातेदाराचे मदतीने व कांही खातेदाराना माहिती नसताना त्यांच्या खात्यातील रक्कम रुपये १,९१,६२०/- चा अपहार केला. तीन टक्के निधीच्या चेक मध्ये रुपये ६,७४,४००/- चा अपहार केला. नमुद कारणास्तव सबंधिताविरुध्द दिनांक २६/७/२००७ रोजी दिंद्रुड पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आला असल्याचे भाग अ मध्ये उल्लेख करण्यात आला आहे. मात्र खालील सहा प्रकरणात नियम बाहय कर्ज वाटप केले आहे त्यामुळे बँकेचे आर्थिक नुकसान झाल्याचे सकृत दर्शनी दिसुन येते.त्याची चौकशी करणे आवश्यक आहे.

१. क्षेत्र नसताना कर्ज वाटप :- दिंद्रुड शाखेत ६ सभासदांना जमिन नसताना १६८०००/- रुपये कर्जवाटप केले आहे.

२. सेवा सो.ने बँकेकडे कर्जमागणी केलेली नसताना वाटप केलेल्या कर्जाबाबत :- किसान क्रेडिट कार्ड योजनेअंतर्गत ऊसपत कर्ज वितरण करताना सेवा सहकारी संस्थेने बँक शाखेकडे कर्ज मागणी केलेली नसताना व सदर डिमांडवर संबंधित संस्थेचे सचिव व चेअरमन यांच्या सहया नसतानाही परस्पर कर्ज प्रकरणे तयार करुन कर्ज वाटप केले आहे एकुण ८ कर्ज प्रकरणे तयार करुन रु २०,०७,६०० कर्ज वाटप केले आहे.

३. मुख्य कार्यालयाची मंजुरी न घेता वाटप केलेल्या कर्जाबाबत:-मुख्य कार्यालयाची मंजुरी न घेता बेकायदेशिरपणे विविध संस्थेतील कर्ज प्रकरणामध्ये १८ सभासदांना रु ६,५२,८००/- रुपये जादा कर्ज वाटप केले आहे.

४. मुख्य कार्यालयाची मंजुरी कमी क्षेत्रासाठी असताना जादा कर्ज वितरण केल्याबाबत :- २६ सभासदांना मुख्य कार्यालयाची कर्ज मंजुरी कमी असतांना रु ४,७७,३६०/- रुपये जादा कर्ज वाटप केले आहे.

५. क्षेत्र कमी असताना केलेल्या कर्जवाटपा बाबत :- कर्ज वितरणाच्या वेळी धारण क्षेत्र कमी असताना व कागदपत्रावर खाडोखोड असताना २० सभासदांना रु २,४९,८४०/- इतके कर्ज जादा वाटप केले आहे

६. अज्ञान सभासदांना केलेल्या कर्ज वाटपा बाबत :- कर्ज वितरण करताना ६ अज्ञान सभासदांना कर्ज वितरण केल्याचे आढळले.अज्ञान सभासदांना कर्ज मंजुरी करण्यासाठी मा.उपजिल्हाधिकारी यांची परवानगी घेणे आवश्यक असतानाही अशी परवानगी घेतलेली नाही. या मध्ये एकुण ६ सभासदांना रु १,१४,६००/- कर्ज वितरीत केले आहे.

**२. संगणक हार्डवेअर व सॉफ्टवेअर खरेदी -**

अ. बँकेने हार्डवेअर खरेदीसाठी रु.८७३७०००/- व सॉफटवेअर खरेदीसाठी रु.२८७००००/- या प्रमाणे एकुण रु.१११६.०० लाख रुपयाची खरेदी केली या खरेदीसाठी मा.विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था लातूर यांना कार्योत्तर मान्यता दिलेली आहे. परंतू बँकेने जिल्हा देखरेख सहकारी संस्थेसाठी ११ संगणकाची खरेदी रु.४५३२००/- केली यास वरील कार्यालयाची मान्यता नाही. याशिवाय जनरेटर खरेदी रु.२५२८०००/- विना परवानगी केलेली आहे. हा करार ज्या कंपनीबरोबर झाला व त्या करार पत्रात ज्या

अटी होत्या त्याचे पालन कंपनीने केले नांही व १४ शाखांचे यु.पी.एस. खराब झाले व कंपनीने ते दुरुस्त करुन दिले नांहीत. यात बँकेचे कामजाचे व जिंदगीचे नुकसान झाल्याचे दिसून येते.

निविदा मध्ये मॅझीक-इ-मनी या कंपनीने Exide-XHD-1500 12-v.DC.150-AH ही बॅटरी पुरविणे बाबत उल्लेख होता परंतू त्या नंतर Exide-Inva-Queen असा आदेश दिला.बॅटरीच्या मॉडेल मध्ये.किंमती मध्ये आणि त्यामुळे कामकाजाच्या दर्जा मध्ये झालेल्या फरकामुळे/बदलामुळे झालेल्या नुकसानीची शहानिशा करणे आवश्यक ठरते.

**ब-** बॅकेच्या संचालक मंडळाने संस्थेच्या व सभासदाच्या दृष्टीकोनातुन दुरदृष्टीने कामकाज करणे अभिप्रेत आहे.इलेक्ट्रॉनीक वस्तुच्या संदर्भात निरुपयोगी ठरण्याचा वेग अतिप्रचंड असल्या कारणाने कामकाजाची आवश्यकता लक्षात घेऊन लगेचच निरुपयोगी ठरणा-या वस्तुच्या खरेदीचा विचार टाळणे दिर्घकालीन उपयुक्ततेच्या वस्तुचा विचार करुन आवश्यक असताना. बँकेने डॉस बेस सॉफ्टवेअरची खरेदी मॅझीक-इ-मनी या कंपनीस प्रती शाखा रु.७००००/- प्रमाणे ४१ शाखासाठी रु.२८७००००/-ची खरेदी केली परंतू त्याच वेळी विंडोबेस प्रणालीची दिर्घकालीन उपयुक्तता त्या पेक्षा चांगली असल्याने विचार होणे गरजेचे होते. विशेषतहा बँकेच्या एका टिपणीवर डॉस बेस पेक्षा विन्डोबेस प्रणाली उपयुक्त व दिर्घकालीन कामी येणारी असते असा उल्लेख आहे. विन्डो बेससाठी थोडा जादा खर्च येणार होता परंतू उपयुक्ततेच्या दृष्टीने तसा विचार करणे आवश्यक होते. (कारण सध्या खरेदी केलेली डॉस बेस प्रणाली नजिकच्याच भविष्यात निरुपयोगी ठरेल).म्हणजेच कमी किंमतीच्या अल्पजिवी प्रणाली खरेदी केल्यामुळे बँकेचे नुकसान झाले आहे काय याची शहानिशा करणे आवश्यक झाले आहे.

**क-** इलेक्ट्रीक फीटींगसाठी केवळ एकच निवीदा प्राप्त झाली. स्थानीक इलेक्ट्रीकल दुकानाकडून अनेक निवीदा मागविणे शक्य होते. त्यामुळे तुलनात्मक दर प्राप्त झाले असते व कमीत कमी किंमतीत काम झाले असते. परंतू फक्त निर्मल इंटर प्राइझेसने प्रती शाखा रु.४५००/- प्रमाणे ५७ शाखाचे कामासाठी रु.२,५६,०००/- एवढे पेमेंट केले. दिनांक १२/६/२००६ च्या टिपणीमध्ये रु.२५००००/- एवढी रक्कम कंपनीस द्यावी असा उल्लेख असताना. प्रत्यक्षात रु.२,५६,५००/- दिले.म्हणजेच रु.६५००/- जादा पेमेंट केले. या वरुन सदर प्रकरणी वाटाघाटीसाठी वाव होता हे स्पष्ट होते.याशिवाय स्पर्धात्मक चढाओढी मध्ये कमी होण्याची शक्यता नाकारता येत नाही.ही पार्श्वभुमी लक्षात घेता वाजवी पेक्षा जादा रक्कम देवुन बँकचे नुकसान झाले आहे.

**३.विविध प्रकारचे कर्ज वाटप**

१. श्री गजानन सहकारी साखर कारखाना लि. सोनाजी नगर ता.बीड या कारखान्यास रुपये २०० लाख कर्ज मंजुर दि.२८/११/२००६ ठराव क्र.१५(६) तात्पूरते अंतरीम - सदरील कारखान्यास वेळोवेळी अंतरीम कर्जात वाढ देण्यात आल्याचे दिसून येते. सदरील कारखान्याचे विनियोगक्षम भागभांडवल उणे येते. ज्या कारखान्याचे नेटवर्थ व एन.डी.आर.उणे येते अशा कारखान्यास अंतरीम मुदतवाढ वाढीव कर्ज देण्यांत येवू नये असे निर्बंध आहेत. सदर साखर कारखान्याकडे इतर वित्तीय संस्थांचे (राज्य सहकारी बँकेचे) तावे गहाण,नजरगहाण व इतर कर्ज असतांनाही वरिल कर्ज मंजूर केले आहे.(कारखान्याकडे स्वनिधी नाही, या पुर्वीचे अंतरीम कर्ज रु. १२४ लाख व व्याज रु.६३.९८ लाख येणे आहे. वसूली समाधानकारक नांही). हे व्यवहार बँकेच्या हिताच्या दृष्टिने योग्य नाहीत. अशा व्यवहारातुन संस्थेच्या आर्थिक हितास बाधा आली आहे काय आणि असल्यास किती याची शहनिशा करणे.

२.बीड जिल्हा एस.टी. कर्मचारी सहकारी पत संस्था म.बीड या संस्थेस कर्ज मर्यादा रु.३५.३७ लाख असतांना रुपये ४२ लाख कर्ज मंजुर करुन नुतनिकरण केले आहे. हि बाब कर्ज धोरण, नियम व पध्दतीचे उल्लंघन करणारी असून जे बँकेच्या आर्थिक हित साधणारी नाही.

३.शिक्षक सहकारी पत संस्था म.माजलगांव या संस्थेचे विनियोगक्षम भागभांडवल रु.५०५ लाख असतांना सदरील संस्थेस रुपये ५४० लाख कर्ज मंजुर करुन नुतनिकरण करुन कर्ज धोरण, नियम व पध्दतीचे उल्लंघन करुन बँकेचे आर्थिक हित धोक्यात आणले आहे.

४.महात्मा फुले सहकारी पगारदार पत संस्था म.धर्मापुरी या संस्थेचे विनियोगक्षम भागभांडवल २८.२९ लाख २० टक्के दुरावा धरुन त्या पेक्षा कमी कर्ज मंजूर करणे आवश्यक होते. तथापी संस्थेस रु ७५ लाख कर्ज मंजूर केले.

५.आंनद मा.व नागरी पत संस्था म.बीड या संस्थेस कोणतेही निकष न लावता रु ६ लाख कर्ज मंजूर केले. संस्थेची कर्ज धारण करण्याची क्षमतेचा विचार न करता बँकेच्या आर्थिक हिताच्या दृष्टीने अयोग्य आहे.

**<u>ब.मध्यम मुदत कर्ज</u>**

दुध संकलन व शीतकरण प्रकल्प उभारणीसाठी बँकेच्या कार्यकारी समितीच्या दिनांक १७/२/०७ मधील ठराव क्रमांक १०(४) मधील निर्णयानुसार खालील संस्थाच्या सभासदांना मध्यम मुदत कर्ज मंजूर करण्यांत आली. त्या प्रत्येक कर्ज प्रकरणांत अनेक त्रुटी आहेत.

१. श्री पांडुरंग लक्ष्मण गाडे रुपये ४,१६,३१२ /- सेवा सहकारी संस्था म.सिरसमार्ग ता.गेवराई

२.सेवा सहकारी संस्था खाडवी ता.गेवराई श्री जगन्नाथ भगवान शिंदे रु ४,१६,३१२

३. सेवा सहकारी संस्था म. राक्षसभुवन ता.गेवराई भाऊसाहेब कजरु नाटकर रु ४,१६,३१२/-

४. सेवा सहकारी संस्था म. मादळमोही श्री बाबासाहेब लक्ष्मण तळेकर रुपये ४.१६,३१२

५. सेवा सहकारी संस्था म.कोल्हेर ता.गेवराई सौ तारामती दत्तात्र्य चवळे रु ४,१६,३१२/-

६.सेवा सहकारी संस्था म.माळहिवरा ता.परळी श्री बालासाहेब सोपान नागरगोजे रु १०,१४,९७१/-

७.सेवा सहकारी संस्था म.नागपिंपरी ता.परळी श्री विनायक गंगाधर कुलकर्णी रु ६६०७३/-

अशा प्रकारे त्रुटीयुक्त प्रकरणे मंजुर करुन बंकचे आर्थिक हित धोक्यात आलेले आहे.

**<u>४. थकीत कर्ज</u>**

१. आदर्श दालमिल व कृषी प्रक्रिया संस्था म.वडवणी रु ४७.००

२. शेतकरी सहकारी तेल बिया प्रक्रिया सह संस्था, वडवणी रु ३०.६७

३. शेतकरी पाणी पुरवठा सहकारी संस्था म.वडवणी रु ४.७६

४. चंपावती सहकारी तेल व कृषी प्रक्रिया सह संस्था, बीड रु ४३.५१

५.पाटोदा तालुका दुध उत्पादक सहकारी संघ म.पाटोदा रु ७२.३८

६.पाटोदा तालुका दुध उत्पादक सहकारी संघ म.पाटोदा रु २०७.६०

वरिल प्रमाणे ६ संस्था कडील थकबाकी वसुली साठी कोणतेही कार्यवाही केलेली नाही. एकुण थकबाकी रु रक्कम ४१७.९६ लाख आहे. वसुलीसाठी आवश्यक ती कार्यवाही न केल्यामुळे बँकेचे आर्थिक नुकसान होत आहे. या शिवाय ४० पेक्षाही जास्त संस्थाक डे कोटयावधी रुपयाची थकबाकी आहे व वसुलीसाठी ठोस प्रयत्न केलेले नांही.परिणामतः बँकेचे निधी मोठया प्रमाणात अडकले असुन बँकेची आर्थिक स्थिती धोक्यात आली आहे.

**<u>५.साखर कारखान्या कडील कर्ज बाकी</u>**

१.अंबाजोगाई सहकारी साखर कारखाना म.वाघाळा रुपये ४८५.९८ लाख

२.गजानन सहकारी साखर कारखाना लि.सोनाजी नगर बीड रु १९६.४१ लाख

३.कडा सहकारी साखर कारखाना लि.कडा ता.आष्टी रु ५४७.९३ लाख

वरिल कारखान्याना दिलेल्या कर्जा बाबतअनुत्पादक जिंदगीची तरतुद योग्य प्रमाणात केली नाही.त्यामुळे बँकेचे आर्थिक स्थितीवर अनिष्ट परिणाम झाला आहे.

**<u>६. बँक वाहनांचा वापर व वाहनावरील खर्च</u>**

१. गाडी क्रमाक एच २३ ई १४६८ २.एम एच २३ ई ४५५३ ३. एम एच २३-५०२० या तीन वाहनाचा वापर केलेला आहे. वाहन वापरा बाबत नियम तयार करुन घेतले नाहीत. वाहनावरील व इंधनाचा खर्च चुकीच्या पध्दीतीने केलेला आहे. त्यामुळे बँकेचे आर्थिक नुकसान झालेले आहे.

**७.भाडयाच्या वाहनाचा वापर**

बँकेने संपूर्ण वर्षात विविध कारणांसाठी वाहनावर रु.३६६८०७९/- एवढा खर्च केलेला आहे. त्यापैकी रु.१०९२३०२/- हा खर्च स्वत:चे वाहनावरचा असून बाकी सर्व खर्च भाडयाचे वाहनावर झालेला आहे. त्यात डिझेल,ऑईल,इंधन व दिलेले भाडे यांचा समावेश आहे. याचा तपशील डिझेल रु.३८३६८/-, ऑईल रु.१३३/-, इंधन खर्च रु.१४२९३३३/-,भाडे खर्च रु.९७६३३८/- असा एकूण रु.२४०५४७२/- एवढा खर्च झालेला आहे. यात बरीच भाडयाची वाहने कर्ज वसूलीसाठी व बँकेच्या इतर कामासाठी वापरली आहेत असे दर्शविण्यात आलेले आहे. गाडया वसूलीसाठी वापरल्या असल्या तरी किती वसूली झाली याची नोंद नाही. गाडया वापरणा-यांनी त्यांच्या लॉगबुकवर सहया केल्या नांहीत. भाडयाच्या गाड्यावर अमाप खर्च केला असून खर्चावर नियंत्रण ठेवण्यांत येत नांही. लॉगबूक तपासल्याशिवाय त्याचे भाडे अदा केले जाते. कामाचा अहवाल ठेवला जात नाही.झालेला खर्च अवास्तव असुन खर्च व वसुलीचे प्रमाण व्यस्त आहे.झालेल्या खर्चाची शहनिशा करुन अतिरिक्त खर्च निर्धारित करणे अवश्यक ठरते.

**गाडया किरायने घेणे :-** बँकेने कार्यकारी सभा दिनांक ३/५/०६ रोजी ठराव क्रमांक ३ अनुसार विविध प्रकारच्य खर्चास मान्यता दिली आहे. त्यात वसूलीसाठी गाडया महिनाभरासाठी लावल्या आहेत. अशा गाडयांना मंजूरी दिलेली आहे. ज्यावेळी गरज आहे त्यापुरती गाडी किरायाने घेणे योग्य असते. काही गाडया २८ ते ३० दिवस फिरविल्या आहेत. परंतू वसुलीचे प्रमाण खुप कमी आहे. वसुलीसाठी फिरणा-या अधिका-यांवर बँकेच्या मुख्य कार्यालयाचे नियंत्रण नांही. परिणामत:अनावश्यक खर्च झालेला आहे. चौकशी करावी.

**वसुलीसाठी भाडयाने घेतलेले वाहने :-** वाहन क्रमाक एम एच १७-के -८१५४ ,एम एच २३-ई-४७८४ यासह एकुण पाच गाडया वसुलीसाठी भाडयाने घेतल्या त्याचा योग्य वापर न करता मोठया प्रमाणावर खर्च करुन बँकेचे नुकसान केले आहे. त्या बाबत वसुलीसाठी महिन्यात ३० ते ३१ दिवस फिरती केली परंतू वसूली किती केली याचा उल्लेख नांही आणि ३० ते ३१ दिवस फिरती करण अव्यावहारीक (in practical) म्हणुन संशयास्पद आहे. महिनाभर गाडया लावणे योग्य नांही. वाहन खर्चाबाबत चौकशी करावी.

८. बँकेने प्रियदर्शनी मराठवाडा कर्मिशियल प्रिमायसेंस सहकारी संस्था औरंगाबाद येथे गाळा क्र.११६ रु. ८,८९,५००/- एवढया किंमतीत खरेदी केला. सदर ॲसेट्स खरेदी बाबत सन २००४ च्या नाबार्ड तपासणी व लेखा परिक्षण अहवालात कार्यक्षेत्राबाहेर नॉन बँकींग ॲसेट्स मध्ये गुंतवणुक केली. जे की आक्षेपार्ह आहे. असे नमुद केल्यामुळे सदरील मालमत्ता विक्री करण्यांचे ठरले खरेदी केलेल्या जिंदगीची खरी किंमत विक्रीच्या ठरावा नंतर प्रत्यक्ष केलेली विक्री आणि बाजार भावा प्रमाणे किंमत या दृष्टीकोणातून झालेले नूकसान निर्धारित करणे अवश्यक झाले आहे. (याचा पुढे व्यवहार कसा झाला व त्यात बँकेचे काही नूकसान झाले किंवा कसे याची चौकशी करणे आवश्यक आहे).

९. **कर्मचारी वेतन निश्चिती :-** बँकेने त्यांच्य कर्मचा-यांना रु.८५०/- मुळ पगारापर्यंत महागाई भत्ता माहे नोव्हेंबर २००६ पासून रुपये १३१९ टक्के व त्यापुढील मुळ पगाराच्या रक्कमेवर रु. १६५ टक्के प्रमाणे मान्यता दिली. ज्या कर्मचा-याच्य नियुक्तीस सहकार खात्याची परवानगी नांही. अशा कर्मचा-यांना सेवानियमातील तरतूदीप्रमाणे सातत्य देता येणार नांही. या बाबत चौकशी करुन बँकेच्या नुकसानीचा तपशील काढणे आवश्यक आहे.

१०. १९९९-२००० पासुन शिपाई,लिपीक इत्यादी कर्मचा-याना (लिपीक ४५ शिपाई ११) एकत्रीत पगार लिपीक रु २२५० व शिपाई रु १७५० हंगामी नोकर भरती केली होती. या ४५ लिपीकांना रु.३१०-१४३५ ज्युनिअर असिसटंट व ११ शिपायी यांना रु.२६०-१२१० या वेतनश्रेणीत तसेच १४ संगणक प्रशिक्षीत कर्मचा-यांना रु.४२०-१९२०, ३५०-१४७५ व ३१०-१४३५ माहे डिसेंबर २००० पासून वेतनश्रेणी लागू केलेली आहे. बँकेने कर्मचा-यांची भरती करणे पुर्वी मा. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था महाराष्ट्र राज्य पुणे यांची रितसर परवानगी न घेता व आरक्षण धोरणांची अंमलबजावणी न करता भरती

केली आहे. व कर्मचा-यांना वेतनश्रेणी लागू करण्याचा ठराव ऐनवेळेच्या विषयात घेतला आहे हे नियमबाह्य आहे.

**११. कर्मचारी बोनस :-** बँकेने कार्यकारी समिती सभा दिनांक २४/६/२००६ ठराव क्र.११(२) मध्ये बँकेच्या सेवेतील कर्मचा-यांना सन १९९९-२०००,२०००-०१,२००१-०२ या तीन वर्षात वाटप केलेला बोनस कपात करावा असे ठरविले. हे प्रकरण न्यायप्रविष्ट असल्यामुळे कपात केलेल्या बोनसच्या रक्कमा जिल्हा परिषद शाखेत १ वर्षासाठी मुदतठेवीत ठेवल्या. सदरील गुंतवणूकीवर मिळालेले व्याजाची रक्कम संबंधीत सेवानिवृत्त कर्मचा-यास अदा करण्यांस मान्यता देण्यांत आली. सदरील प्रकरण न्यायप्रविष्ट असल्यामुळे व्याजाच्या रक्कमा संबधीताना वाटप करणे ऐवजी त्याच ठेवी मध्ये गुंतवणुक करणे योग्य ठरले असते.मात्र तसे न करता संबंधित कर्मचा-याना वाटप करुन बँकचे अर्थिक नुकसान झाले आहे. या व्यवहारामध्ये उपस्थित संचालक व अधिकारी जबाबदार राहतील.

**१२. शाखास्तरावरील कर्ज वाटप :-** एकुण ४३ शाखामधील ब-याच संस्था व सभासदाना कर्ज वाटप केले वेळी अनेक त्रुटी आहेत लेखापरिक्षण अहवाल सन २००६-२००७ चे पान नंबर १५५ ते १७९ मध्ये बँकेचे आर्थिक नुकसान झाल्याचे प्रथम दर्शनी दिसुन येते.

मा.श्री बदामराव पंडीत माजी राज्यमंत्री यांनी दिनांक २/२/२००८ रोजी या कार्यालयास सादर केलेल्या तक्रारी अर्जाची प्रशासकीय दृष्टीकोनातुन चौकशी करण्यासाठी श्री जाधव जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था,नांदेड यांची नियुक्ती करण्यात आली होती.त्यानी दिनांक ३०/७/२००८ रोजी सादर केलेल्या अहवालाचे अवलोकन केले असता तक्रारी मध्ये सकृतदर्शनी तथ्य आढळुन येते. त्याचा समावेश कलम ८३ खालील चौकशीत करण्यांत येत आहे.

२. बीड जिल्हा बँकेने विनापरवाना नोकरभरती चालू ठेवली असून यापुर्वीसुध्दा २०० कर्मचारी बेकायदेशीररित्या भरती केल्याचे निदर्शनास आले.

३. बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्य चेअरमनच्या मर्जीतील कर्मचा-यांना सिनिऑरीटी लिस्ट बगळून अनेकांना उच्चपदी जागेवर बेकायदेशीर रित्या संचालक मंडळाच्य सभेत परवानगी न घेता व कर्मचारी समितीच्या विषय पत्रीकेवर विषय बगळून नियुक्त्या दिलेल्या आहेत व सभेत चर्चा अथवा विषय न ठेवता सभा संपल्यानंतर विषयपत्रीकेमध्ये या विषयाला लिहून मंजूरी देण्यांत आलेल्या आहेत.

४. बँकेत स्टेश्नरी व छपाई खरेदी यात कोणतीही पारदर्शकता न दाखविता सदर बाबीची प्रसिध्दी न देता बोगस पध्दतीने मर्जीतील लोकांना हे काम दिले जात आहे. सदर स्टेश्नरीची कामे बँकेस येत आहेत किंवा नांहीत हे ही पाहिले न जाता ताबडतोब बिले अदा केली जातात.

५. आपल्या मर्जीतील लोकांना ताबडतोब कर्ज देवून व वसूलीमध्ये मर्जीतील लोकांना सुट देवून सहकारी संस्थात कमीत कमी वसूली करुन कर्ज खाते बंद केलेली आहेत. त्यामुळे बँकेस आर्थिक तोटा झालेला आहे. बँकेमध्ये अनेक संचालक मंडळाच्य सभा व इतर सभेमध्ये विषय पत्रीका वगळता ऐनवेळी विषय अनेक सभेत घेवून त्यास मंजूरी देतात. त्यामुळे बँकेची आर्थिक नुकसान झालेली आहे.

६. पूर्वीचेच बँकेच्या सर्व शाखेचे फर्निचर व इतर अत्याधुनिक साहित्य धुळ खात पडले असतांना आणखी नविन ५ कोटी रुपयाचे जवळपास फर्निचर खरेदी करुन बँक दिवाळखोरीत काढण्याचे लक्षण दिसत आहे.

७. अंदाजे ५ कोटी पेक्षा जास्त रुपयाचे बँक ईमारत दुरुस्तीचे काम विभागीय सहनिबंधक, लातुर यांच्या परवानगीशिवाय केले जात आहे.

विभागीय सहनिबंधक
सहकारी संस्था, लातुर